# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

क्र. मऔविम/भूविभाग/म.व्य(भूमी)/A ११११२०

"उद्योग सारथी"
मरोळ औद्योगिक क्षेत्र
महाकाली गुंफा मार्ग
अंधेरी(पूर्व),मुंबई-९३
दिनांक :- 15 MAR 2018

## परिपत्रक

**विषय :-** **एकाच कुटुंबातील/रक्ताच्या नात्यातील भागभांडवलधारकामध्ये होणा-या बदलाबाबत..**

**संदर्भ :-** १. मऔविम/मुदतवाढ/विधी व कामकाज/१४३ दिनांक १२.१२.२०११
२. मऔविम/विधी व कामकाज/१६४ दिनांक ०१.०१.२०१३

एकाच कुटुंबातील/रक्ताच्या नात्यातील सदस्यांचा भागभांडवलधारक म्हणून समावेश करणे आणि भागिदारी संस्था/प्रोप्रायटरी प्रायव्हेट लिमिटेड अथवा पब्लिक लिमिटेड कंपनी यामध्ये रुपांतर होत असताना मूळ भागधारकामध्ये होणारे बदल याबाबत, तसेच कंपनीचे Merger होत असताना हस्तांतरणाबाबत संदर्भिय परिपत्रकान्वये धोरण निर्गमित केलेले आहे. तथापि, अशा प्रकारे एकाच कुटुंबातील/रक्ताच्या नात्याच्या व्यक्तीचा समावेश करुन रुपांतर करताना जे प्रमाणित हस्तांतरण शुल्क लागू करण्याचे धोरण आहे तेच धोरण कुटुंबातील सदस्यांचा समावेश करुन होणा-या Merger बाबत देखील प्रमाणित हस्तांतर शुल्क (STF) आकारणेची मागणी होत असल्याने सदरहू विषय संचालक मंडळाच्या दिनांक ३०.११.२०१५ रोजीच्या ३६४ आणि दि. १०.०२.२०१६ रोजीच्या ३६५ व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदरहू विषयावर चर्चा होऊन ठराव क्र. ५५४७ पारीत करण्यात आला आहे. सदर ठरावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे धोरण निर्गमित करण्यात येत आहे.

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील IT/ITES उद्योगातील नोंदणीकृत भूखंडधारक (Lessee) कंपनीचे कंपनी कायद्यानुसार इतर कंपनीसोबत Merger होत असेल आणि सदरहू Merger होत असताना भूखंडधारक (Lessee) कंपनीतील अथवा त्याअंतर्गत असलेल्या भागधारक कंपन्यांमधील महामंडळाच्या भूखंड हस्तांतरणासाठी विहीत केलेल्या कुटुंबाच्या व्याख्येप्रमाणे रक्ताच्या नात्यातील सदस्यांचे एकत्रित भागभांडवल ५१ टक्के पेक्षा कमी नसेल व Merger होणा-या कंपनीत अथवा त्या अंतर्गत कंपन्यामध्ये महामंडळाने विहित

केलेल्या कुटुंबाच्या व्याख्येप्रमाणे, रक्ताच्या नात्यातील सदस्यांचे एकत्रित भागभांडवल ५१ टक्के पेक्षा कमी नसेल व Merger नंतरही सदर सदस्यांचे भागभांडवल ५१ टक्के पेक्षा कमी होत नसेल, अशा हस्तांतरणास/ बदलास महामंडळाचे परिपत्रक दि. ०१.०१.२०१३ व दि. १२.१२.२०११ नुसार मूळ भागधारकात झालेला बदल न मानता किंवा अधिमूल्याची फरकाची रक्कम वसुल न करता प्रमाणित हस्तांतर शुल्क (STF) आकारण्यात यावे. सदरचे धोरण हे फक्त वरीलप्रमाणे पात्र IT/ITES उद्योगांसाठी/विकासकासाठी शासनाच्या प्रचलित IT धोरणाच्या कालावधीपर्यंत लागू राहील.

उपरोक्त धोरण सद्य:स्थितीत प्रलंबित प्रकरणांकरीता देखील लागू करण्यात यावे. परंतु ज्या प्रकरणी उपरोक्त ठरावाच्या दिनांका अगोदर हस्तांतरणापोटी भूखंड/शेड/गाळा धारकांनी रक्कम भरणा केली आहे त्यांचा पुर्नविचार करण्यात येवू नये.

सदरहू परिपत्रक विधी विभागाच्या सहमतीने व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मऔविम, मुंबई**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी/सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
५. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
६. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
७. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
८. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१०. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
११. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१२. सर्व औद्योगिक संघटना.
१३. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई.